शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा

## शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा–यांसाठी
## आचार–संहितेचे प्रारुप

**उद्देश :**

शैक्षणिक संस्थेमध्ये कार्यरत असणा–या सर्व कर्मचा–यांसाठी शासन, विद्यापीठ आणि मातृसंस्था यांनी लागू केलेले काही नियम असतात, व त्यांचे काटेकोरपणे पालन करणे हे प्रत्येक कर्मचा–याचे कर्तव्य असते. या नियमांव्यतिरिक्त कर्मचा–यांची आचार संहिता व तिचे पालन हा त्यांच्या नैतिक उत्तरदायित्वाचा भाग असतो. विद्यार्थी, शैक्षणिक संस्था व व्यापक अर्थाने संपूर्ण समाज यांच्या टिकाऊ विकासासाठी, कर्मचा–यांनी स्वतः आचार–संहिता तयार करणे व तिचे पालन करणे आवश्यक व उचित ठरते.

**अध्यापन :**

1. अध्यापकांनी कामकाजाच्या वेळेचे काटेकोरपणे पालन करावे. त्यांनी निर्धारित वेळेवर यावे आणि महाविद्यालयात पूर्णवेळ उपस्थित रहावे.
2. अध्यापकांनी वेळापत्रकानुसार आपल्या सर्व तासिका घ्याव्यात. काही कारणाने विद्यार्थी–संख्या कमी असली तरी वर्ग सोडू नयेत.
3. शैक्षणिक सत्रात निर्धारित पाठ्यक्रम, प्रात्यक्षिके, प्रकल्प अहवाल इत्यादी पूर्ण होतील याची काळजी घ्यावी.
4. घटक चाचण्या, अंतर्गत परीक्षा इत्यादींचे मूल्यांकन त्वरीत करुन त्याची नोंद करावी; तसेच विद्यार्थ्यांच्या कामगिरीतील त्रुटी त्यांच्या निदर्शनास आणाव्यात.
5. शैक्षणिक डायरीमध्ये पाठ्यक्रम–नियोजन, दैनंदिन अध्यापन, इतर कार्ये यांची नियमितपणे नोंद करावी, आणि ठराविक अवधीने संस्था प्रमुखांची स्वाक्षरी घ्यावी.
6. अध्यापकांनी अध्यापनाव्यतिरिक्त संस्थेच्या इतर कार्यांमध्ये सहकार्य द्यावे.
7. स्वतःच्या विकासाच्या दृष्टीने अध्यापकांनी नियतिम वाचन, सहका–यांशी चर्चा, लेखन, संशोधन, परिषदांमध्ये सहभाग इत्यादींकडे लक्ष द्यावे.
8. अध्यापकांनी खजगी शिकवणी वर्ग घेऊ नयेत; उलट विद्यार्थी त्यापासून परावृत्त होतील असे अध्यापन करण्यावर भर द्यावा.
9. आपल्या संस्थेशिवाय इतर संस्थेमध्ये शैक्षणिक योगदान देण्यापूर्वी रीतसर अनुमती घ्यावी
10. सुटीची पूर्वसूचना द्यावी, आणि सहका–यांच्या मदतीने तासिकांचे समायोजन करावे.

**शिक्षकांची इतर कार्ये :**

1. महाविद्यालयाने किंवा मातृसंस्थेने जी इतर कामे अध्यापकांकडे सोपविली असतील ती कामे त्यांनी मनःपूर्वक पार पाडावीत; तसेच इतरांच्या कार्यांमध्येही सहभागी व्हावे.
2. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व–विकासाच्या कार्यक्रमांमध्ये त्यांना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे.
3. ग्रंथालयीन साहित्याचा अधिकाधिक उपयोग करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
4. स्वतःच्या विषयाचे ज्ञान वाढविण्याच्या दृष्टीने नवीनतम संदर्भाचा उपयोग करणे, चर्चा सत्रांमध्ये सक्रिय भाग घेणे, संशोधन कार्य करणे याकडे अध्यापकांनी लक्ष द्यावे.
5. महाविद्यालयीन विस्तार–सेवेच्या माध्यमातून समाजाला लाभान्वित करण्यासाठी प्रयत्नशील असावे.
6. महाविद्यालयीन शिक्षणाची गुणवत्ता वृध्दिंगत करण्याच्या प्रयत्नांना मदत करावी.
7. आवश्यकतेनुसार प्रशासकीय कार्यात मदत करावी.

**शिक्षकेतर कर्मचा–यांची कार्ये :**

1. विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून प्रशासकीय कार्याची कार्यक्षमता उच्च पातळीला ठेवावी.
2. कार्यालयीन कामकाज/विषयक नियमांचे कटाक्षाने पालन करावे.
3. सूचना–पेटीच्या माध्यमातून मिळणा–या प्रतिसादाची दखल गांभीर्याने घेउन कार्यपध्दतीत सुधारणा करावी.
4. संपर्कात येणा–या सर्व पदाधिका–यांशी, सहाका–यांशी, विद्यार्थ्यांशी व पालकांशी सौहार्दपूर्ण वागणूक ठेवावी.
5. कार्यालयीन कामकाजातील अडचणींबाबत वरिष्ठांना वेळोवेळी माहिती देऊन ते सुरक्षित करण्याचा प्रयत्न करावा.

**आचरण :**

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा–यांनी ही जाणीव ठेवावी की विद्यार्थी हा महाविद्यालयीन कार्याचा केंद्रबिंदू असून उत्तम व अर्थपूर्ण शिक्षण मिळणे तसेच कार्यक्षम सेवा मिळणे हा त्याचा अधिकार आहे. यादृष्टीने सर्व कर्मचा–यांनी आपल्या आचरणात आत्मियता, प्रामाणिकपणा, परस्पर सद्भाव, मानवी मूल्यांचा आदर, कार्यनिष्ठा यांचे संवर्धन करावे.

**आचार संहितेची अंमलबजावणी :**

1. शैक्षणिक संस्थेचा एक जबाबदार घटक या नात्याने प्रत्येक शिक्षकाने व शिक्षकेतर कर्मचा–याने आचार संहितेचे स्वतःच पालन करावे अशी अपेक्षा आहे.
2. आचार–संहितेचे पालन व्यवस्थितपणे होते आहे अथवा नाही याकडे संबंधित विभाग–प्रमुखांनी लक्ष द्यावे; आणि आवश्यकतेनुसार संस्था–प्रमुखांशी संपर्क साधावा.
3. या संदर्भात काही अडचणी येत असल्यास कर्मचा–यांनी मोकळेपणाने संस्था–प्रमुखांशी चर्चा करावी. अडचणींचे निराकरण करण्याचा प्रयत्न संस्था–प्रमुखांनी करावा.
4. संस्थेमध्ये लागू असलेले विविध नियम तसेच सर्व कर्मचा–यांची नैतिक जबाबदारी याबाबत निष्काळजीपणा किंवा जाणीवपूर्वक पायमल्ली करण्याची वृत्ती आढळून आल्यास संस्थेच्या प्रमुखांनी त्याची गंभीर दखल घ्यावी व निर्धारित प्रकियेनुसार कार्यवाही करावी.
5. बदलल्या परिस्थितीनुसार आचार–संहितेत बदल करण्याची गरज भासल्यास 'आचार–संहिता समिती' मार्फत योग्य ते बदल करण्यात यावेत.

अध्यापक परिषदेच्या निर्देशानुसार हे आचार–संहितेचे प्रारुप समितीने तयार केले आहे. संहितेची अंमलबजावणी दिनांक **1 जानेवारी, 2008** पासून करण्यात येईल.

दिनांक :

समन्वयक
आचार–संहिता समिती

अध्यक्ष (प्राचार्य)
आचार–संहिता समिती

वरील प्रारुप दि. 28.11.2007 ला झालेल्या सभेसमोर ठेवण्यांत आले व ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| 1. | प्राचार्य, डॉ.म.क.नगराळे | अध्यक्ष |
| 2. | डॉ. वि. ज. कविमंडन | समन्वयक |
| 3. | श्री. डब्ल्यु. बी. राऊत | सदस्य |
| 4. | प्रा. बी. व्ही. तिजारे | सदस्य |
| 5. | प्रा. एस. एस. कानोडे | सदस्य |
| 6. | प्रा. डब्ल्यु. एच. शिंदे | सदस्य |
| 7. | प्रा. बी. एन. जक्कुलवार | सदस्य |
| 8. | प्रा. एस. जी. जांभूळकर | सदस्य |
| 9. | प्रा. एस. आय. मोहम्मद | सदस्य |
| **10.** | **प्रा. के. यु. जाजू** | **सदस्य** |
| 11. | श्री. के. जी. मेंढे | सदस्य |